पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.महिला व बालकल्याण समिती

**कार्यपत्रिका क्रमांक ६**

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक ११/०९/२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **११/०९/२०१३** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. लोंढे शुभांगी संतोष - सभापती
२) मा. तापकीर अनिता मच्छिंद्र
३) मा. सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
४) मा. गोफणे अनुराधा देविदास
५) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.कुलकर्णी – सहा.आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.जगताप – समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे – सहा.प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक १४/०८/२०१३, २८/०८/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्र.५** ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला -</u>**

विषय क्र. १) महानगरपालिकेच्या प्रत्येक शाळेत अभ्यासिका चालु करणेबाबत..

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला</u> -

ठराव क्रमांक – १० विषय क्रमांक – १

दिनांक – ११/०९/२०१३

सुचक – मा.अनिता तापकीर अनुमोदक – मा. विमलताई जगताप

संदर्भ:- मा.अनिता तापकीर, मा.विमलताई जगताप यांचा प्रस्ताव..

१) महानगरपालिकेच्या प्रत्येक शाळेत अभ्यासिका चालु करणे. २) कॉम्प्युटर क्लासेस प्रत्येक प्रभागात संस्था नेमुन क्लास राबविणे. ३) पी.सी.एम.सी चे विद्यार्थ्यांसाठी १० वी पर्यंत जे पास मिळतात ते मुलींना १२ वी पर्यंत देण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**( लोंढे शुभांगी संतोष )**
**सभापती**
मा.महिला व बाल कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ८५४ /२०१३
दिनांक - १२ / ०९ /२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.